महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६४ वा | दिनांक : १८/१२/२०२५ | वार : गुरूवार

## वाल्मिक कराडला हायकोर्टाचा मोठा झटका : संतोष देशमुख हत्या प्रकरणात जामीन फेटाळला



**छत्रपती संभाजीनगर :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात कराडने दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे तो पुढील काळासाठीही कोठडीतच राहणार आहे. या निकालामुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, गावासह संपूर्ण परिसरात न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत होत आहे. या संवेदनशील प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले होते आणि आजचा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.

वाल्मिक कराडने औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सविस्तर सुनावणी झाली. मात्र, सरकारी पक्षाचा युक्तीवाद त्या दिवशी पूर्ण होऊ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणी १६ डिसेंबर रोजी ठेवली होती. त्यानंतर आज अंतिम निर्णय देत न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज नामंजूर केला. ही सुनावणी न्यायमूर्ती सुशिल एम. घोडेस्वार यांच्या न्यायालयात पार पडली.

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांविरोधात खून तसेच मकोका कायद्याअंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पासून वाल्मिक कराड कोठडीत आहे. दीर्घकाळ कोठडीत असल्याने आणि आपल्याला जामीन मिळावा यासाठी त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणातील गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे पाहता न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला आहे.

कराडच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ शिरीष गुप्ते यांनी जोरदार युक्तीवाद केला होता. त्यांनी असा दावा केला की, कराडला अटक करताना पोलिसांनी अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिली नाहीत, त्यामुळे ही अटक बेकायदेशीर ठरते. तसेच, या प्रकरणात मकोका कायदा चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला असून, मकोका लागू करण्यासाठी दिलेली मंजुरीही नियमबाह्य असल्याचा युक्तीवाद करण्यात आला. याशिवाय, संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी वाल्मिक कराड घटनास्थळापासून शेकडो किलोमीटर दूर असल्याचा दावा करत, त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगण्यात आले. कराडला खोट्या पद्धतीने गोवण्यात आले असून, त्याच्याविरोधात थेट पुरावे नसल्याचा मुद्दा उपस्थित करत जामीन देण्याची मागणी करण्यात आली होती.

मात्र, आरोपीच्या वकिलांचे सर्व युक्तीवाद सरकारी पक्षाने ठोस पुराव्यांच्या आधारे खोडून काढले. मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी न्यायालयासमोर देशमुख हत्याकांडाचा संपूर्ण घटनाक्रम मांडला. प्रत्येक टप्प्यावर साक्षीदार उपलब्ध असून, सीडीआर रिपोर्ट, सीसीटीव्ही फुटेज, तसेच आरोपींच्या आपसातील ऑडिओ रेकॉर्डिंग सरकारकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, या सर्व पुराव्यांना पुष्टी देणारे न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे अहवालही सरकारी पक्षाकडे असल्याचे नमूद करण्यात आले. या ठोस पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज फेटाळत, त्याला कोणतीही सवलत देण्यास स्पष्ट नकार दिला. या निर्णयामुळे देशमुख कुटुंबाला न्याय मिळण्याची आशा अधिक बळावली असून, प्रकरणाचा पुढील तपास आणि न्यायप्रक्रिया वेगाने पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुंडेंना मंत्री केले तर फडणवीसांना माफ करणार नाही- अंजली दमानिया



**मुंबई :** महापालिकेच्या तोंडावर महाराष्ट्रात अनेक घडामोडी घडताना दिसत आहेत. एकीकडे निवडणुकांची तयारी, तर दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. इतकेच नव्हे, तर यात भर म्हणून आता अजित पवारांच्याच पक्षातील माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी राजधानी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

माणिकराव कोकाटेंच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची शक्यता असतानाच धनंजय मुंडे यांनी अमित शहा यांची भेट घेणे हा योगायोग नसून मंत्रिपदासाठी सुरू असलेली सेटिंग आहे की काय? असा प्रश्न अनेकांना पडत आहे. यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी ट्विट करत जोरदार टीका केली आहे. तसेच धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेतले तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या जन्मी माफ करणार नसल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे.

अंजली दमानिया यांनी ट्विट करत म्हटले की, ना खाउंगा ना खाने दुंगा म्हणणाऱ्या पक्षाचे अमित शहा, मला म्हणजे भ्रष्टाचारा विरोधात लढणाऱ्या व्यक्तिला वेळ देत नाहीत, पण अजित पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे आणि आता धनंजय मुंडे यांना भेटण्याची वेळ देतात. यात काय ते समजून जा, असे दमानिया यांनी म्हटले आहे. तसेच भाजपला काय बोलू, शब्दच उरले नाहीत, अशी टीका दमानिया यांनी केली आहे.

पुढे अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर असलेल्या आरोपांची थेट यादीच केली आहे. त्या म्हणाल्या, ज्या धनंजय मुंडेंवर १) बीड बँक घोटाळ्याचे आरोप आहेत, २) बंदूक राज आणल्याचे आरोप आहेत, ३) महाजेनको मधून राख चोरल्याचे आरोप आहेत, ४) आवादा कंपनीकडून खंडणी मागीतल्याचे आरोप आहेत, ५) कृषी घोटाळ्याचे आरोप आहेत, ६) दहशत, बंदूकराज, गुंडाराज केल्याचे आरोप आहेत आणि सगळ्यात किळसवाणे म्हणजे ज्या क्रूर पद्धतीने स्व. संतोष देशमुख यांची हत्या ज्यांनी करवून घेतली त्या विकृत वाल्मीक कराडची उणीव भासते, असे म्हणणारे धनंजय मुंडे जर परत मंत्री म्हणून परत आले, तर या भाजपचा बहिष्कार लोकांनी केला पाहिजे, असे दमानिया म्हणाल्या. तसेच जर फडणवीसांनी हे होऊ दिले, तर मी या जन्मी त्यांना माफ करणार नाही, असे अंजली दमानिया यांनी स्पष्ट म्हटले आहे.

## साताऱ्यातील ड्रग्स प्रकरणात एकनाथ शिंदेंचे लागेबांधे, महाराष्ट्र कॉंग्रेसचा गंभीर आरोप



**मुंबई :** सातारा जिल्ह्यात सावरी गावात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या रिसॉर्टजवळ असलेल्या एका शेडमधून मुंबई गुन्हे शाखेने धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईतून जवळपास ४५ किलो ड्रग्स जप्त केले असून याची बाजारपेठेतील किमत १४५ कोटी इतकी आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आता कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील निशाणा साधला आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबई येथील टिळक भवन येथे पत्रकार परिषद घेत एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, सावरी गावात एवढा मोठा ड्रग्सचा कारखाना सुरू होता याची कल्पना सातारा पोलिसांना होती पण त्यांनी कारवाई केली नाही. मुंबई गुन्हे शाखेने ही कारवाई केली. साताऱ्याचे पोलिस अधीक्षक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत जवळचे संबंध आहेत. हे तेच पोलिस अधीक्षक आहेत ज्यांनी आंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना मराठा समाजाच्या माता भगिनींवर अमानुष लाठी हल्ला केला होता. साताऱ्यातील ड्रग्स प्रकरणी शिंदे व फडणवीस यांची मिलीभगत आहे का? या प्रश्नाचे उत्तर फडणवीस आणि शिंदे यांनी दिले पाहिजे. एवढा मोठा ड्रग्सचा कारखाना असल्याचे उघड झाले असताना अद्याप यामागील खऱ्या सूत्रधारावर कारवाई केलेली नाही. या सावरी गावाजवळच एकनाथ शिंदे यांचे दरे हे गाव असून त्यांचा भाऊ प्रकाश शिंदे यांचा हा काळा धंदा सुरू होता. सावरी गावातील ड्रग्सचा कारखाना व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लागेबांधे असल्यानेच सरकार ठोस कारवाई करत नाही, असा गंभीर आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, सातारा ड्रग्स प्रकरणावरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी निवडणुक आयोगाची मदत घेण्यात आली व महानगरपालिका निवडणुकांची घाईघाईने घोषणा करण्यात आली. मतदार याद्या अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. १५ तारखेला मतदार याद्या जाहीर करणार होते पण आता बुथनिहाय २७ तारखेला या मतदार याद्या जाहीर केल्या जाणार आहेत. उमेदवारी अर्ज भरण्यास २३ तारखेपासून सुरुवात होत आहे आणि उमेदवारी अर्जावर उमेदवाराला तसेच सुचक, व अनुमोदक यांना त्यांचे मतदार यादीतील भाग क्रमांक, अनुक्रमांक लिहावा लागतो पण मतदार याद्याच नाहीत तर अर्ज कसे भरणार? असा सवालही सपकाळ यांनी उपस्थित केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ डिसेंबर २०२५


## पिशोर येथे राष्ट्राचा गौरव भिल्ल जमात पुस्तकाचे प्रकाशन संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर ता. कन्नड येथे जेष्ठ साहित्यिक प्रा. अंबादास सगट लिखित 'राष्टाचा गौरव भिल्ल जमात' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. लेखक प्रा. अंबादास सगट यांनी आपल्या मनोगतात पुस्तक लेखना बद्दल चे मत मांडले, डोंगर दरी खोर्यात राहणाऱ्या आदिवासी भिल्ल समाजाचे सामाजिक तसेच विविध स्वातंत्र्य लढ्यात असलेले योगदान, संघर्ष या बाबत सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वातीताई पाडळकर तर कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून पवन जी सोनवणे, भाष्य- लेखक, शिवव्याख्याते डॉ. संजयजी गायकवाड, मार्गदर्शक म्हनून चंद्रकांत जी मुगले, साई देशपांडे, डॉ.पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन तथा कार्यक्रमाचे प्रास्ताविक विमलताई गांगुर्डे यांनी केले. याप्रसंगी ज्योतीताई भिलेगावकर, कचरु उमक, विश्वनाथ निकाळजे, मच्छिंद्रनाथ काकडे, परशुराम गायकवाड , संतोष मोकासे, तसेच समस्त परिसरातील ग्रामस्थ, समस्त भिल्ल समाज आदींनी कार्यक्रमाला उपस्थित राहून "राष्ट्राचा गौरव : भिल्ल जमात" या पुस्तकाचे गौरव करत सर्वांना भरभरुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत प्रसिद्ध कवी लक्ष्मण वाल्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बांधकाम मजुराचा मुलगा भारतीय सैन्यदलात अग्निवीर



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट राठोड शुभम भारतीय सैन्यदलात अग्निवीर म्हणून भरती झाला. त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्याचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. शुभम कदेर तांडयाचा रहिवासी असुन वडिल मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात . गरीबी परिस्थितीमुळे शुभमला कोणत्याही अकॅडमीला न पाठवता वडिलानी त्याला स्वत: तयारी करण्यासाठी प्रोत्साहित केले तसेच श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी ला प्रवेश घेण्यास सांगितले. त्यांच्या इच्छेप्रमाणे मोठा मुलगा हवलदार बनला.परंतु शुभमने भारतीय सैन्यदलातच भरती व्हावे व देशाची सेवा करावी अशी त्यांची इच्छा होती.हे त्याने सिद्ध करून दाखवले.त्याच्या सत्कारप्रसंगी प्राचार्यांनी मार्गदर्शन करताना इतर कॅडेटसनी पण यशस्वी कॅडेटसचा आदर्श घेऊन या पुढे होणाऱ्या सर्व वेगवेगळ्या विभागातील पोलीस,सैन्यदल, बीएसएफ,सीआरपीएफ , आसाम रायफलस,आयटीबीपी भरतीची तयारी करून महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा,पोलीस,आर्मी पूर्व प्रशिक्षण,करिअर कट्टा स्पर्धा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घेऊन आपले जीवन सार्थकी लावावे असे आव्हान केले.या सत्कार समयी डॉ पद्माकर पिटले,डॉ अशोक पदमपल्ले,डॉ विनोद देवरकर,कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले ,डॉ व्यंकट सुर्यवंशी,डॉ सूर्यकांत रेवते,डॉ धनराज इटले,प्राध्यापक, कॅडेट्स उपस्थित होते .

## जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथील विद्यार्थ्यांची गौताळा परिसरात निसर्ग सहल



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांना परिसरातील गोष्टींचा अनुभव यावा व क्षेत्रभेट व्हावी या उद्देशाने प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथील विद्यार्थ्यांची आज दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी उंबरखेडा येथून रामपूरवाडी ,पुरणवाडी तसेच गौताळा परिसरात निसर्ग सहल काढण्यात आली.गौताळा येथील सीता खोरी धबधबा तसेच संग्रहालयाला भेट देऊन शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रवीण शिंदे यांनी अभयारण्यातील पक्षी, प्राणी तसेच विविध वनस्पती यांची विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात निसर्ग सहलीचा आनंद घेतला. सर्वांनी एकत्र वनभोजन केले. पुरणवाडी येथील महादेव मंदिर परिसरात विद्यार्थ्यांसाठी स्वादिष्ट भेळ बनवण्यात आली व त्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे उमेश हुकुमदार, पांडुरंग सुपेकर,प्रदीप पवार, मनोज रायसिंगे, फुरकान शेख लक्ष्मण गझलवाड अतुल दसोडे चंद्रकांत बामणीया सर्व शिक्षक व धनंजय अहिरे प्रवीण राठोड अंकुश राठोड तसेच शालेय पोषण आहार शिजवणारे सुशीला ताई तसेच मदतनीस सचिनही उपस्थित होते.

## लोककलावंत संतोष सिरसाठ यांचा एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन लोकप्रबोधन कार्यक्रमाअंतर्गत लोककलावंत लेखक संतोष सिरसाठ यांच्या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के हे होते. यावेळी लोककलावंत संतोष सिरसाठ यांनी 'दारूड्या' या एकपात्री नाट्यातून चांगल्या संस्कारित रामरावच्या घराची व्यसनामुळे कशी वाताहात होते हे विविध पात्रांद्वारे त्यांच्या स्वभाव, वैशिष्ट्य व लकबीतून विनोद, अभिनय व उपहासाद्वारे संतोष सिरसाठ यांनी विद्यार्थी रसिकांना खिळवून ठेवले . या नाट्यात त्यांनी दहा भूमिकांचे सादरीकरण करत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आदी सामाजिक दोषांवर प्रकाश टाकला. प्रारंभी आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा नवनाथ गोरे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर .व्ही. मस्के यांनी आजच्या तरूण युवकांनी कोणत्याही अमली पदार्थ, तंबाखू , मद्य अशा वाईट व्यसनापासून तसेच वाईट संगतीपासून दूर राहण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आरती पांडे व डॉ. गौतम घाडगे यांनी केले तर आभार डॉ. ज्योती केदारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी डॉ. महेश आकुलवार , डॉ. पूजा वडमारे , डॉ. दीपाली गायकवाड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ डिसेंबर २०२५


## प्रशासनाची सर्वसामान्यांमध्ये प्रतिमा उजळ करावी - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**कन्नड (अरुण थोरात) :** महसूल प्रशासनाची सर्वसामान्य व्यक्तिमध्ये असणारी प्रतिमा उजळ करण्याचे काम आपणा सर्वांचे आहे त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे, सोबतच काम करत असताना आपण आपल्या वैयक्तिक आयुष्याकडेही लक्ष देऊन आपले छंदही जोपासायला हवे असे मत छत्रपती संभाजीनगर चे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले आहे. ते कन्नड येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून कन्नड उपविभाग स्तरीय मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, संजय कुंडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कन्नड चे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उपजिल्हाधिकारी स्वरूप कंकाळ, डॉ. किरण जाधव, आयपीएस, महा आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग, उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, प्र. तहसीलदार दिलीप कुमार सोनवणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविण दाभाडे यांनी केले. यावेळी तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी, महसूल कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## प्रा. जिजा शिंदे यांना संस्कृती प्रतिष्ठानचा साहित्य पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** संस्कृती प्रतिष्ठानतर्फे (इचलकरंजी, जि.कोल्हापूर) दिले जाणारे २०२५ चे साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये देवगिरी महाविद्यालय येथे कार्यरत असणारे कवी/ समीक्षक प्रा. जिजा शिंदे यांच्या "श्याम मनोहर साहित्य आणि समीक्षा" या ग्रंथास अत्यंत मानाचा " दगडूलाल मर्दा स्मृती संस्कृती समीक्षा राज्य पुरस्कार" जाहीर झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप पाच हजार रु.रोख, शाल, स्मृतीचिन्ह ,ग्रंथ असे आहे. या पुरस्काराची निवड समीक्षकप्रा.रणधीर शिंदे (कोल्हापूर), कवयित्री/ समीक्षक अंजली कुलकर्णी (पुणे) यांच्या निवड समितीने केली आहे.प्रा.जिजा शिंदे यांचे काळी माती निळे आभाळ, वेचक आणि वेधक, सारेच पुरुष नसतात बदनाम : चर्चा आणि चिकित्सा, साहित्य वेध ,श्याम मनोहर साहित्य आणि समीक्षा आदी ग्रंथ प्रकाशित झाले असून त्यांना भारत सरकार साहित्य अकादमी दिल्लीची राष्ट्रीय साहित्य-प्रवासवृत्ती (फेलोशिप) प्राप्त असून त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोशासाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी, लेखकांच्या साहित्याची नोंद केली आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार,भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली) डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार, जगद्गुरु साहित्य परिषदेचा (जालना) शेष मराठी ग्रामीण राज्य साहित्य पुरस्कारही मिळाले आहेत.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत, तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


# डिसेंबरची शिक्षण परिषद रावणकोळा येथे पार पडली



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अतनूर केंद्राची माहे डिसेंबर २०२५ ची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रावणकोळा येथे पार पडली यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री के पी बिराजदार साहेब होते, केंद्रप्रमुख मीनाताई पाटील मॅडम, केंद्रीय मुख्याध्यापक कदम मॅडम साधन व्यक्ती व तज्ञ मार्गदर्शक श्री पेद्देवाड सर, सुलभक श्री गोपीनाथ केंद्रे सर, बंडरे सर व सर्व केंद्रातील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते यावेळी जिल्हा परिषद मरसांगवी शाळेतील कबड्डीचा संघ राज्य स्तरावर गेल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रावण कोळा शाळेच्या वतीने संघाचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला व शिक्षण परिषदेत अतनूर केंद्राच्या वतीने अभिनंदन करण्यात आले, शिक्षण परिषदेच्या नियोजनाप्रमाणे सर्व तासिका घेण्यात आल्या सकारात्मक शिस्त या विषयावर श्रुत लेखनाविषयी श्री गोपीनाथ केंद्रे सरानी सविस्तर माहिती सांगितली तर अपूर्णांक संकल्पना व उपयोजन यावर्षी श्री बंडरे सरांनी मार्गदर्शन केले उजास उपक्रम व मासिक पाळी व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन श्री गोपीनाथ केंद्रे सरांनी केले . मध्यंतरामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रावण कोळा शाळेच्या वतीने स्वादिष्ट भोजनाची सोय करण्यात आली होती. तेव्हा सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला नंतर प्रशासकीय माहिती ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सरांनी तसेच केंद्रप्रमुख मीनाताई पाटील मॅडम कडून व केंद्रीय मुख्याध्यापक कदम मॅडम कडून सांगण्यात आली खेळीमेळीच्या वातावरणात ही शिक्षण परिषद पार पडली शेवटी आभार राजू नागरगोजे सरांनी मानले.

## अर्थशास्त्रात एचडी पदवी मिळाल्याबद्दल पठाण जाहेद खान यांचा महानगरपालिका शाळेत सत्कार








**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर या शाळेतील माध्यमिक शिक्षक पठाण जाहेदखान साहेबखान यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांच्या मानव्य विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र (संशोधन विषय - मराठवाड्यातील अन्नप्रक्रिया उद्योग एक अध्ययन ) विद्यावाचस्पती पी. एच डी पदवी मिळालाबाबत शाळेतील मुख्याध्यापक प्रभाकर पुंजाबा शिंदे व इतर शिक्षक सर्जेराव वाघ, संग्राम सिंग राजपूत, वसंत राठोड, संदीप चव्हाण, सूर्यवंशी, सय्यद इरफान, मनीषा शिंदे, अरुणा फुलंब्रीकर, मंगलतारो, बेबी राऊत, अर्चना भारद्वाज, अनुजा भिंगोले, विशाखा, विद्या सासवडे, कवठेकर, रवींद्र खापे, सुनिता साबळे इत्यादी शिक्षकांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ डिसेंबर २०२५

# अल्पसंख्याक हक्क : भारतीय लोकशाहीची सामाजिक व नैतिक कसोटी

**भा**रत हा जगातील सर्वात वैविध्यपूर्ण समाजांपैकी एक आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती, पंथ, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हेच भारतीय समाजाचे वैशिष्ट्य राहिले आहे. या बहुविधतेमुळे भारताला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख मिळाली असली, तरी याच विविधतेतून अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण झाले आहेत. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक या संकल्पना केवळ संख्येच्या आधारावर ठरलेल्या नसून त्या समाजातील सत्तासंबंध, संसाधनांवरील नियंत्रण आणि सामाजिक वर्चस्वाशी जोडलेल्या आहेत. 18 डिसेंबर रोजी साजरा होणारा 'अल्पसंख्याक हक्क दिन' हा केवळ एका विशिष्ट समुदायाच्या अधिकारांची आठवण करून देणारा औपचारिक दिवस नसून, तो भारतीय लोकशाहीच्या सामाजिक जाणिवेची, नैतिक अधिष्ठानाची आणि समतावादी मूल्यांची कसोटी पाहणारा महत्त्वाचा प्रसंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, अल्पसंख्याक हक्कांचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी, सामाजिक सलोख्याशी आणि लोकशाहीच्या भवितव्याशी थेट संबंधित आहे.समाजशास्त्रात 'अल्पसंख्याक' ही संकल्पना केवळ संख्यात्मक नसून ती गुणात्मक आणि संरचनात्मक स्वरूपाची आहे. एखादा समुदाय संख्येने कमी असला तरी सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी असू शकतो, तसेच एखादा समुदाय संख्येने मोठा असूनही सामाजिकदृष्ट्या दुर्बल असू शकतो. त्यामुळे अल्पसंख्याकत्व हे केवळ आकड्यांवर ठरत नाही, तर त्या समुदायाचे सत्तासंबंधांतील स्थान, संसाधनांपर्यंत पोहोच आणि सामाजिक स्वीकार यावर अवलंबून असते. भारतीय समाजरचनेत बहुसंख्याक समुदायाकडे असलेले सांस्कृतिक वर्चस्व, राजकीय प्रभाव आणि आर्थिक साधनसंपत्ती यामुळे अल्पसंख्याक समुदाय अनेकदा काठावर ढकलले जातात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क ही संकल्पना 'विशेष सवलत' म्हणून न पाहता, समाजातील ऐतिहासिक आणि संरचनात्मक असमतोल दूर करण्याचा एक आवश्यक उपाय म्हणून पाहणे गरजेचे आहे.भारतीय संविधानाने अल्पसंख्याक समुदायांना मूलभूत हक्कांच्या माध्यमातून व्यापक संरक्षण दिले आहे. धर्मस्वातंत्र्य, धार्मिक आचार पाळण्याचा अधिकार, सांस्कृतिक आणि भाषिक ओळख जपण्याचे स्वातंत्र्य, तसेच शैक्षणिक संस्था स्थापन व चालवण्याचा अधिकार या तरतुदी भारताच्या बहुसांस्कृतिक वास्तवाची घटनात्मक मान्यता आहेत. संविधान निर्मात्यांना हे स्पष्टपणे माहीत होते की, विविधतेने नटलेल्या समाजात जर सर्व समुदायांना समान संरक्षण दिले नाही, तर सामाजिक असंतोष आणि संघर्ष अपरिहार्य ठरतील. मात्र समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, घटनात्मक तरतुदी आणि प्रत्यक्ष सामाजिक व्यवहार यांच्यात अनेकदा मोठी दरी असते. कायद्याच्या पुस्तकात असलेले हक्क प्रत्यक्ष जीवनात कितपत अंमलात येतात, हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे.अल्पसंख्याक समुदायांचे दैनंदिन सामाजिक अनुभव पाहिले, तर अनेकदा त्यांना उघड किंवा अप्रत्यक्ष भेदभावाचा सामना करावा लागतो. रोजगाराच्या संधी, शिक्षणातील प्रवेश, घरभाडे, सार्वजनिक सेवांचा वापर, सामाजिक स्वीकार अशा विविध क्षेत्रांत त्यांना वेगळ्या नजरेने पाहिले जाते, अशी भावना अनेक अल्पसंख्याक व्यक्ती व्यक्त करतात. समाजशास्त्र सांगते की, भेदभाव हा नेहमीच थेट आणि हिंसक स्वरूपात दिसून येत नाही; तो अनेकदा सूक्ष्म, अदृश्य आणि 'सामान्य' वाटणाऱ्या दैनंदिन व्यवहारांत लपलेला असतो. संशयाने पाहिले जाणे, सतत आपली निष्ठा सिद्ध करण्याची अपेक्षा ठेवली जाणे किंवा एखाद्या संपूर्ण समुदायाला काही व्यक्तींच्या कृतींसाठी दोषी ठरवले जाणे, हे सर्व सामाजिक भेदभावाचेच प्रकार आहेत. अशा अनुभवांमुळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते आणि समाजातील एकात्मतेला तडे जातात.लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती एक मूल्याधिष्ठित सामाजिक व्यवस्था आहे. बहुसंख्याकांचे मत हे लोकशाहीतील एक महत्त्वाचा घटक असला, तरी लोकशाहीची खरी ताकद अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या संरक्षणात असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, बहुसंख्याकवाद आणि लोकशाही यामध्ये मूलभूत फरक आहे. बहुसंख्याकवाद म्हणजे बहुसंख्याकांच्या इच्छेचे वर्चस्व, तर लोकशाही म्हणजे सर्व घटकांचा सन्मान, सहभाग आणि सुरक्षितता. जर बहुसंख्याकांच्या नावाखाली अल्पसंख्याकांच्या अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या, तर लोकशाहीचे स्वरूप हळूहळू संकुचित होते. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिन हा लोकशाहीच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरतो.समाजातील ध्रुवीकरण ही एक गंभीर सामाजिक प्रक्रिया आहे. धर्म, भाषा, संस्कृती किंवा ओळखीच्या आधारे समाजाचे 'आपण' आणि 'ते' असे विभाजन झाले, तर सामाजिक सलोखा धोक्यात येतो. समाजशास्त्रानुसार, अशा प्रकारचे ध्रुवीकरण अनेकदा राजकीय फायद्यासाठी प्रोत्साहित केले जाते, मात्र त्याचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम अत्यंत घातक ठरतात. अल्पसंख्याक समुदायांना 'परके', 'संशयास्पद' किंवा 'धोकादायक' म्हणून पाहिले जाऊ लागले, तर त्यांच्या सामाजिक सहभागावर मर्यादा येतात. परिणामी दूरता वाढते, असुरक्षितता निर्माण होते आणि समाजात अविश्वासाचे वातावरण पसरते. अशा परिस्थितीत अल्पसंख्याक हक्क दिन हा समाजाला स्वतःकडे आरसा दाखवणारा दिवस ठरतो.शिक्षण ही समाजपरिवर्तनाची सर्वात प्रभावी साधनेपैकी एक आहे. मात्र शिक्षण जर केवळ नोकरी, स्पर्धा आणि आर्थिक प्रगतीपुरते मर्यादित राहिले, तर समाजातील असमानता कमी होत नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, शिक्षणातून मूल्यनिर्मिती होणे अत्यंत आवश्यक आहे. विविधतेचा सन्मान, सहिष्णुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी हक्कांची जाणीव ही मूल्ये शिक्षणातून रुजवली गेली, तर अल्पसंख्याकांविषयीचे गैरसमज आणि पूर्वग्रह कमी होऊ शकतात. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षकांची भूमिका आणि शैक्षणिक वातावरण हे सर्व समाजाच्या विचारसरणीवर प्रभाव टाकतात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिनाच्या निमित्ताने शिक्षणव्यवस्थेची सामाजिक भूमिका पुन्हा एकदा तपासण्याची गरज आहे.माध्यमे ही आधुनिक समाजातील एक अत्यंत प्रभावी सामाजिक संस्था आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमे ही केवळ माहिती देत नाहीत, तर समाजातील वास्तव कसे पाहिले जाईल, हेही ठरवतात. माध्यमांतून अल्पसंख्याक समुदायांचे चित्रण कसे केले जाते, यावर समाजाची मानसिकता अवलंबून असते. जर एखाद्या समुदायाचे सातत्याने नकारात्मक, सनसनाटी किंवा साचेबद्ध चित्रण झाले, तर समाजात भीती, संशय आणि द्वेष वाढण्याची शक्यता असते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, माध्यमे ही वास्तवाचे केवळ प्रतिबिंब नसून अनेकदा वास्तव घडवणारी शक्ती असतात. त्यामुळे माध्यमांनी अधिक जबाबदार, संतुलित आणि संवेदनशील भूमिका घेणे हे अल्पसंख्याक हक्कांच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे.कायदा आणि प्रशासन हे लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. अल्पसंख्याक समुदायांना न्याय मिळेल, अशी खात्री वाटली, तर त्यांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास दृढ होतो. मात्र न्यायप्रक्रिया जर संथ, गुंतागुंतीची किंवा पक्षपाती वाटली, तर असंतोष वाढतो. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की, न्यायव्यवस्थेवरील विश्वास हा सामाजिक स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अल्पसंख्याक हक्कांचे संरक्षण करताना कायद्याची अंमलबजावणी ही केवळ औपचारिक न राहता, मानवी आणि समतावादी दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. न्याय म्हणजे केवळ शिक्षा देणे नव्हे, तर समाजातील विश्वास आणि सलोखा पुनर्स्थापित करण्याची प्रक्रिया आहे.जागतिकीकरण, शहरीकरण आणि स्थलांतर या प्रक्रियांमुळे भारतीय समाज झपाट्याने बदलत आहे. या बदलांमुळे काही अल्पसंख्याक समुदायांना नव्या संधी उपलब्ध होत असल्या, तरी अनेकांना नव्या प्रकारच्या असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. रोजगारातील स्पर्धा, सांस्कृतिक ओळखीचा प्रश्न, सामाजिक स्वीकार आणि आर्थिक विषमता या मुद्द्यांवर ताण वाढत आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, बदलाच्या काळात दुर्बल घटक अधिक प्रभावित होतात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिन हा बदलत्या सामाजिक वास्तवाचा सखोल विचार करण्याचा आणि समतावादी भविष्यासाठी दिशा ठरवण्याचा दिवस ठरतो.अल्पसंख्याक हक्कांचा प्रश्न हा केवळ अल्पसंख्याक समुदायांपुरता मर्यादित नाही. तो बहुसंख्याक समाजालाही आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो. विविधतेचा स्वीकार म्हणजे बहुसंख्याकांनी आपली ओळख गमावणे नव्हे, तर ती अधिक व्यापक, समृद्ध आणि मानवी बनवणे होय. समाजशास्त्र सांगते की, ज्या समाजात विविधतेचा सन्मान केला जातो, तिथे सर्जनशीलता, सांस्कृतिक समृद्धी आणि सामाजिक स्थैर्य वाढते. उलट ज्या समाजात एकसारखेपणाचा आग्रह धरला जातो, तिथे असंतोष, दूरता आणि संघर्ष वाढण्याची शक्यता असते.18 डिसेंबरचा 'अल्पसंख्याक हक्क दिन' आपल्याला हे ठामपणे स्मरण करून देतो की, लोकशाही ही केवळ राजकीय व्यवस्था नसून ती एक सतत चालणारी सामाजिक प्रक्रिया आहे. अल्पसंख्याक समुदाय भयमुक्त वातावरणात, आत्मसन्मानाने आणि समान संधींसह जगू शकतील, तेव्हाच भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने सशक्त ठरेल. अल्पसंख्याक हक्कांचे रक्षण करणे ही केवळ शासनाची किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नसून, प्रत्येक सजग नागरिकाची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे. कारण ज्या समाजात सर्व घटकांना समान सन्मान, समान हक्क आणि समान संधी मिळतात, तोच समाज खऱ्या अर्थाने न्याय्य, संवेदनशील आणि टिकाऊ लोकशाही समाज ठरतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra५@gmail.com